महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/ २८ /२०२५ दि. २२/०२/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, विठ्ठलवाडी व अंबरनाथ** वाहतूक उपविभागाचे हद्दीत शिव मंदिर येथे **'महाशिवरात्री'** निमित्त सालाबादप्रमाणे महाशिवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. गतवर्षीप्रमाणे यावर्षी दि. २६/०२/२०२५ रोजी **'महाशिवरात्री'** उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे दरम्यान भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) हिंदु स्मशानभूमीकडून गोविंद तीर्थ पुलाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **हिंदु स्मशानभूमी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वैभव हॉटेलकडून हिंदु स्मशानभूमी पासुन सरळ वडवली सेक्शन मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गाने हुतात्मा चौकाकडुन मटका चौकातुन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) वैभव हॉटेल कडून अंबरनाथ रेल्वे स्टेशन मार्गे मटका चौकापर्यंत येणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना **वैभव हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदर वाहने वैभव हॉटेल येथुन आनंदनगर एमआयडीसी, टी जंक्शन, फॉरेस्ट नाका, लादीनाका, डीएमसी चौक, मटका चौक, अंबरनाथ पश्चिम येथून पुढे इच्छित स्थळी जातील.

ब) अंबरनाथ बदलापुर एम.आय.डी.सी. येथुन कामगारांना ने आण करणाऱ्या बसेस हया एम.आय.डी.सी. ते टि. पॉईंट, फॉरेस्ट नाक, डि.एम.सी.चौक मार्गे गांधी चौक येथे कामगारांना रेल्वे स्टेशनकडे जाणा करीता सोडुन परत त्याच मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) मटका चौकाकडुन हुतात्मा चौकाकडे जाणाऱ्या सर्व जड अजवड वाहनांना **मटका चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** नमूद मार्गावरून जाणारी सर्व जड अवडज वाहने ही लादीनाक, फॉरेस्ट नाका, टी पॉईंट, वैभव हॉटेल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) अंबरनाथ आनंदनगर एमआयडीसी व शिवाजीनगर कडून येणाऱ्या हलक्या वाहनांना **रोटरी क्लब** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** नमूद मार्गावरून जाणारी सर्व हलकी वाहने रोटरी क्लब – छत्रपती शिवाजी महाराज चौक – हुतात्मा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) कैलास कॉलनी, उल्हासनगर नं. ५ कडून स्वामी समर्थ चौक, अंबरनाथ पर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना **कैलास कॉलनी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कैलास कॉलनी येथून पालेगांव मार्गे किंवा सुभाष टेकडी, उल्हासनगर नं.४ कानसई मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २५/०२/२०२५ रोजी १८:०० वा. ते दि. २७/०२/२०२५ रोजी सकाळी ०५:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner